




सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २०९ • सोमवार दि.१८ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.


## नीट पेपरफुटी प्रकरण:'आरसीसी'चे शिवराज मोटेगावकरांना अखेर अटक

### ११ तास चौकशी,तीन दिवसाच्या छापेमारीत डिजिटल पुरावे जप्त;१०० कोटींची वार्षिक उलाढाल



मुंबई/प्रतिनिधी- वैद्यकीय शिक्षणासाठी घेण्यात आलेल्या प्रवेश पूर्व परीक्षा अर्थात नीट पेपरफुट प्रकरणी लातूर-नांदेडसह महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये कोचिंग क्लासेस करणाऱ्या मधील आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर यांना आज अखेर अटक करण्यात आली आहे. शुक्रवारी त्यांची ११ तास सीबीआयच्या पथकाने लातूरमध्ये चौकशी केली. रविवारी आरसीसी कोचिंग क्लासेसच्या कार्यालयावर छापे मारले होते. या छापेमारी दरम्यान अनेक महत्वपूर्ण कागद, इलेक्ट्रानिक उपकरणे सीबीआयने ताब्यात घेतले होते. रविवारी आणि सोमवारी पहाटे पर्यंत शिवराज मोटेगावकर यांची कसुन चौकशी केल्यानंतर अखेर सकाळी त्यांना सीबीआयच्या पथकाने पुण्यात अटक केली आहे. दिल्लीतील सीबीआयच्या विशेष न्यायालयासमोर त्यांना लवकरच हजर करण्यात येणार आहे.

देशभरात खळबळ उडवून दिलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला आता वेग आला असून केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) महाराष्ट्रातील विविध शहरांत धाडसत्र सुरू केले आहे. पुणे, नाशिक, अहिल्यानगर आणि लातूर येथे करण्यात आलेल्या कारवाईदरम्यान अनेकांना ताब्यात घेण्यात आले असून, शुक्रवारी तब्बल अकरा तास चौकशी केल्यानंतर सीबीआयच्या पथकाने मोटेगावकर यांच्या निवासस्थानी आणि ट्युशन क्लासेसमध्ये छापेमारी केली होती. या कारवाईत महत्त्वाची कागदपत्रे, संगणक, हार्डडिस्क, मोबाईल फोन तसेच अन्य डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली. त्यानंतर आज सकाळी पुण्यातील सीबीआय कार्यालयात त्यांना अधिकृतरीत्या अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली. दरम्यान, लातूर शहरातील ट्युशन **पान ४ वर**

### नांदेडमध्ये क्लासेससमोर शुकशुकाट

नांदेड/प्रतिनिधी-शिवराज मोटेगावकर यांना सीबीआयने अटक केल्यानंतर नांदेडमधील आरसीसी कोचिंग क्लासेस परिसरात शुकशुकाट पसरल्याचे चित्र रविवारी पाहायला मिळाले. अटकेची माहिती समोर येताच क्लासेसच्या कर्मचाऱ्यांनी सर्व शटर बंद करून प्रवेशद्वारांना कुलूप लावले.

आज सकाळी सहा वाजताच्या पहिल्या बॅचसाठी विद्यार्थी क्लासेससमोर दाखल झाले होते. मात्र, ट्युशनला सुट्ट्या आहेत, असे सांगत विद्यार्थ्यांना परत पाठवण्यात आले. काही वेळातच मोटेगावकर यांच्या अटकेची बातमी शहरभर पसरल्यानंतर आरसीसीच्या सर्व गेटला मोठे कुलूप लावण्यात आले. नीट यूजी पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने रेणुकाई केमिस्ट्री क्लासेस (आरसीसी) चे संस्थापक शिवराज रघुनाथ मोटेगावकर यांना लातूरमधून अटक केली आहे. अटकेनंतर नांदेडमधील विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील वर्ग सुरू होणार का याबाबत अनिश्चितता आहे. दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परिसरात पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## नांदेडसह राज्यातील १७ विधान परिषद जागांसाठी १८ जूनला मतदान

मुंबई/प्रतिनिधी-विधान परिषदेवर स्थानिक स्वराज्य मतदारसंघातून निवडून द्यावयाच्या १७ जागांसाठी १८ जूनला मतदान व २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाने एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे. यामध्ये नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेवर एक प्रतिनिधी निवडून द्यावयाचा आहे.

गेल्या दोन ते अडीच वर्षांपासून रखडलेल्या या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेवर प्रतिनिधींच्या रिक्त असलेल्या १७ जागांवर आता प्रतिनिधी निवडले जाणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार १८ जून रोजी मतदान तर २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे. नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाकडे विशेष लक्ष लागले असून, जिल्ह्यातील बदललेली राजकीय समीकरणे, विविध पक्षांची ताकद आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची पार्श्वभूमी यामुळे ही निवडणूक प्रतिष्ठेची मानली जात आहे. जिल्ह्यातील प्रमुख राजकीय पक्षांनी आतापासूनच उमेदवारांची चाचपणी आणि रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.राज्यातील विधान परिषदेच्या एकूण ७८ सदस्यांपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतून निवडून येतात. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेत न झाल्याने या जागा दीर्घकाळ रिक्त राहिल्या होत्या. आता निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे.या निवडणुकीत सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी -सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर-जालना आणि नागपूर या मतदारसंघांचा समावेश आहे. नागपूर मतदारसंघात पोटनिवडणूकही होणार असून, हा मतदारसंघ पूर्वी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिनिधित्व केला होता. या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार २५ मे रोजी अधिसूचना जाहीर केली जाणार आहे. तर उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख:१ जून, अर्जांची छाननी:२ जून, अर्ज माघारी घेण्याची अंतिम तारीख:४ जून, मतदान:१८ जून (सकाळी ८ ते दुपारी ४) व मतमोजणी:२२ जून रोजी होणार आहे. नांदेडसह मराठवाड्यातील अनेक मतदारसंघांत या निवडणुकीत चुरशीची लढत होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, आगामी राजकीय समीकरणांसाठी ही निवडणूक महत्त्वाची ठरणार आहे

## नीट परीक्षा घोटाळ्याविरोधात नांदेडमध्ये 'एसएफआय'चे तीव्र आंदोलन




नांदेड/प्रतिनिधी-नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी, निकालातील सावळागोंधळ आणि शिक्षण क्षेत्रातील वाढत्या भ्रष्टाचाराविरोधात १८ मे रोजी स्टुडंटस् फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) नांदेड जिल्हा कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी संतप्त विद्यार्थ्यांनी केंद्र सरकार आणि शिक्षण माफियांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. आंदोलनानंतर एसएफआयच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

या निवेदनात एसएफआयने आरोप केला आहे की, राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने (एनटीए) नीट परीक्षेच्या गोपनीयतेचा पुरता खेळ खंडोबा केला असून वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे सामान्य कुटुंबातील गोरगरीब विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची केंद्र सरकारने क्रूर थट्टा केली आहे. हा केवळ एक घोटाळा नसून प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या कष्टाची दिवसाढवळ्या झालेली लूट आहे. या पार्श्वभूमीवर, देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या या गंभीर घोटाळ्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मुख्य मागणी संघटनेने केली आहे. तसेच या संपूर्ण घोटाळ्याची सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांमार्फत सखोल व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, पेपरफुटीच्या मुख्य सूत्रधारांना कठोर कायद्यांतर्गत जन्मठेपेची शिक्षा व्हावी आणि ज्या परीक्षा केंद्रांवरून हे गैरप्रकार झाले आहेत त्यांची मान्यता त्वरित रद्द करण्यात यावी, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत. जोपर्यंत परीक्षा प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता येत नाही तोपर्यंत दोषींवर कठोर कारवाई सुरूच राहावी, असेही निवेदनात नमूद केले आहे. शिक्षण संस्थांच्या व्यापारीकरणामुळे आणि केंद्र व राज्य सरकारच्या निष्क्रियतेमुळे आज तरुण विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड नैराश्य पसरले असून लाखो तरुणांचे भविष्य उद्धस्त होण्याची भीती निर्माण झाली **पान ४ वर**

## पत्रकारांना डावलून खरीप पूर्व हंगाम नियोजन आढावा बैठक;हदगांव कृषी विभागाच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरात हदगाव विधानसभा क्षेत्राचे आ.बाबुराव कदम कोहळीकर यांच्या अध्यक्षतेखाली खरीप पूर्व हंगाम नियोजन आढावा बैठक पंचायत समितीच्या सभागृहात रविवारी पार पडली. आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या, अडचणी तसेच कृषी विभागाशी संबंधित विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शेतकऱ्यांना वेळेवर बियाणे, खते व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्याचे समजते बैठकीस कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच संभाराव लांडगे, बाळासाहेब कदम, बाबूसराव कदम, गोपाल सारडा, अनिल पाटील बाभळीकर, भास्कर वानखेडे, संदेश पाटील हडसणीकर, सुदर्शन पाटील मनुलेकर, बाबुराव काळे यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते. मात्र, या बैठकीत पत्रकारांना जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आल्याचा आरोप होत असून कृषी विभागाच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस तालुक्यातील विविध राजकीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना निमंत्रित करण्यात आले होते. परंतु वृतमानपत्राच्या प्रतिनिधींना कोणतीही माहिती देण्यात आली नसल्याने पत्रकारांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे स्थानिक पत्रकारांचे म्हणणे आहे की, खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बोगस बियाणे, बनावट खते, कृषी केंद्रांवरील अनियमितता, खत साठवण गोडाऊन तपासणी, तसेच शेतकऱ्यांनी तक्रार अथवा गोपनीय माहिती कुठे द्यावी यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर बैठकीत चर्चा होणे अपेक्षित होते. तालुक्यात भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे का, याबाबतही स्पष्टता **पान ४ वर**

### व्ही.डी.सतीशन यांनी मुख्यमंत्रीपदाचा पदभार स्वीकारला

तिरुवनंतपुरम:व्ही.डी.सतीशन यांनी केरळचे १३ वे मुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांनी त्यांना आणि त्यांच्या संपूर्ण मंत्रिमंडळाला (२० मंत्री) पदाची शपथ दिली. ६१ वर्षांच्या कालावधीनंतर प्रथमच असा सोहळा पार पडला. यापूर्वी, राज्याचे तिसरे काँग्रेस मुख्यमंत्री आर. शंकर यांनी १९६२ मध्ये त्यांच्या संपूर्ण मंत्रिमंडळासह शपथ घेतली होती, परंतु १९६४ मध्ये अविश्वास ठरावानंतर त्यांचे **पान ४ वर**

## सरन्यायाधीशांचा त्रागा:कारणे,प्रश्न आणि जबाबदारी



नांदेड-देशात सध्या विविध पातळ्यांवर अविश्वासाचे वातावरण निर्माण होताना दिसते. राजकीय पक्षांवरील विश्वास कमी होत आहे, प्रशासकीय यंत्रणांबाबत शंका व्यक्त होत आहेत आणि लोकशाही संस्थांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अशा परिस्थितीत न्यायव्यवस्था हीच सामान्य नागरिकांसाठी शेवटची आशा आणि विश्वासाचे केंद्र राहते. म्हणूनच न्यायालये आणि विशेषतः सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेकडे देशाचे लक्ष अधिक संवेदनशीलतेने लागलेले असते. अशावेळी देशाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अलीकडील वक्तव्यांमुळे निर्माण झालेली चर्चा केवळ त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी संबंधित नाही, तर न्यायव्यवस्थेच्या कार्यपद्धतीबाबतही अनेक प्रश्न उपस्थित करणारी आहे.

मागील काही दिवसांत शिवसेना पक्षाचे चिन्ह आणि पक्षावरील मालकी हक्क यासंबंधीच्या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी शिवसेना नेत्यांच्या वक्तव्यांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायालयांबद्दल बेताल वक्तव्य करणे किंवा न्यायसंस्थेचा अवमान करणारी भाषा वापरणे नक्कीच योग्य नाही. न्यायालयांबद्दल आदर आणि संयम राखणे हे सर्वांचे कर्तव्य आहे. त्यामुळे त्यांच्या संतापाचे कारण काही प्रमाणात समजून घेता येते,




परंतु या प्रकरणाचा दुसरा पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसशी संबंधित महत्त्वाचे राजकीय खटले गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित आहेत. या काळात सर्वोच्च न्यायालयाने काही इतर प्रकरणांमध्ये तातडीने हस्तक्षेप करून जलद निर्णय दिलेले दिसतात. मग काही निवडक प्रकरणांमध्येच अशी विलंबाची स्थिती का निर्माण झाली?, हा प्रश्न स्वाभाविक आहे. न्याय मिळणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच तो योग्य वेळी मिळणेही आवश्यक असते. विलंबित न्याय हा अन्यायासमान मानला जातो, ही उक्ती केवळ तत्त्वज्ञान नाही तर न्यायप्रक्रियेचे मूलभूत सत्य आहे.

सुनावण्यांमध्ये वारंवार पुढील तारखा दिल्या जात असल्याने राजकीय पक्षांच्या नेत्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आणि त्यातूनच काही जणांनी न्यायालयांवर कठोर टीका केली. ती भाषा नक्कीच सुसंस्कृत नव्हती, परंतु त्या टीकेमागील कारणांनाही पूर्णपणे दुर्लक्षित करता येणार नाही. लोकशाही व्यवस्थेत न्यायालयांनाही लोकांच्या प्रश्नांना आणि अपेक्षांना उत्तर द्यावे लागते. यापूर्वीही एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी आरटीआय कार्यकर्ते, पत्रकार आणि सुशिक्षित बेरोजगार यांच्याबद्दल ''झुरळे आणि वाळवी'' अशी उपमा वापरल्याचे वृत्त चर्चेत आले. अशा प्रकारची भाषा न्यायसंस्थेच्या सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीकडून अपेक्षित नसते. न्यायाधीश हे केवळ कायद्याचे भाष्यकार नसतात, तर त्यांच्या शब्दांमधून संस्थेची प्रतिष्ठा आणि मूल्येही प्रतिबिंबित होत असतात. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक वक्तव्याला विशेष महत्त्व प्राप्त होते. मात्र या सर्व घटनांकडे पाहताना सरन्यायाधीशांच्या कामाच्या वाढत्या ताणाचाही विचार करणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयात हजारो खटले प्रलंबित आहेत. वाढते काम, संवेदनशील प्रकरणे आणि सततचा सार्वजनिक दबाव यामुळे मानसिक ताण वाढणे स्वाभाविक आहे. पण अशा परिस्थितीत संयम आणि संतुलन राखणे हीच न्यायव्यवस्थेची खरी ओळख असते.

न्यायसंस्था ही केवळ निर्णय देणारी यंत्रणा नसून लोकशाहीचा आत्मा आहे. त्यामुळे न्यायालयांवर टीका करताना मर्यादा पाळणे जितके आवश्यक आहे, तितकेच न्यायालयांनीही आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. विश्वास कमावण्यासाठी केवळ अधिकार पुरेसे नसतात; त्यासाठी पारदर्शकता, वेळेवर निर्णय आणि लोकांच्या भावनांबाबत संवेदनशीलता आवश्यक असते. कारण शेवटी, लोकांचा विश्वास टिकून राहणे हीच न्यायव्यवस्थेची सर्वात मोठी ताकद असते.

# महासत्तेची स्वप्ने आणि संकटांचे आव्हान

**भारताला जगातील महासत्ता बनवण्याचे स्वप्न गेल्या काही वर्षांत सातत्याने मांडले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जागतिक स्तरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा समावेश, जी-२० अध्यक्षपदाचे यशस्वी आयोजन, डिजिटल अर्थव्यवस्थेतील वाढ, अवकाश संशोधनातील कामगिरी आणि परराष्ट्र धोरणातील सक्रिय भूमिका यामुळे भारताच्या प्रतिमेत नक्कीच वाढ झाली आहे. मात्र दुसरीकडे देशातील आर्थिक, सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय संकटांची वास्तव परिस्थितीही दुर्लक्षित करता येणार नाही. महासत्तेची स्वप्ने दाखवताना जमिनीवरील प्रश्नांवरही तितक्याच गंभीरतेने उपाययोजना करणे आवश्यक आहे.अलीकडच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध सभांमध्ये नागरिकांना काटकसरीचा संदेश दिला आहे. महागाई, जागतिक आर्थिक अस्थिरता आणि वाढत्या आंतरराष्ट्रीय संघर्षांच्या पार्श्वभूमीवर हा संदेश देण्यात आला आहे. मात्र याचवेळी जनतेच्या मनात एक प्रश्न निर्माण होतो की, काटकसर करण्याचा सल्ला देताना शासनाच्या धोरणांमध्येही त्याचे प्रतिबिंब दिसते का? कारण मोठ्या प्रमाणावर आयोजित होणारे कार्यक्रम, प्रचार यंत्रणा आणि शासकीय खर्च यावरून अनेकदा विरोधकांकडून प्रश्न उपस्थित केले जातात.भारताची अर्थव्यवस्था आज जगातील वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक मानली जाते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेनेही भारताच्या विकासदराविषयी सकारात्मक अंदाज व्यक्त केले आहेत. परंतु विकासदराची आकडेवारी आणि सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील वास्तव यात अनेकदा अंतर दिसते. बेरोजगारी, महागाई, शेती क्षेत्रातील समस्या, वाढते कर्ज आणि असंघटित क्षेत्रातील अडचणी हे प्रश्न अजूनही गंभीर आहेत. पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या किंमतीं मधील चढ-उतारांचा थेट परिणाम सामान्य कुटुंबांच्या आर्थिक गणितावर होत आहे.जागतिक घडामोडींचा परिणाम भारतावर होणे स्वाभाविक आहे. रशिया-युक्रेन संघर्ष, पश्चिम आशियातील तणाव आणि जागतिक पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे अनेक देश आर्थिक दबावाखाली आले आहेत. भारतही त्याला अपवाद नाही. कच्च्या तेलाच्या किंमती वाढल्या तर त्याचा थेट परिणाम वाहतूक, उद्योग आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतींवर होतो. अशा परिस्थितीत संकटांचा सामना करण्यासाठी दीर्घकालीन धोरणे आखण्याची आवश्यकता अधिक जाणवते.गेल्या काही वर्षांत ''विश्वगुरू'' हा शब्द राजकीय आणि सामाजिक चर्चेचा विषय ठरला आहे. भारताने जगाला योग, तत्त्वज्ञान, विज्ञान आणि लोकशाहीची मूल्ये दिली आहेत, हे वास्तव असले तरी केवळ घोषणांनी किंवा प्रतिमा निर्मितीने देश विश्वगुरू होत नाही. आर्थिक स्थैर्य, सामाजिक समता, गुणवत्तापूर्ण शिक्षण, मजबूत आरोग्य व्यवस्था आणि आत्मनिर्भर उत्पादन क्षमता यावर त्या स्थानाची पायाभरणी होत असते. नेतृत्वाची खरी कसोटी ही संकटकाळात लागते. जनतेला केवळ मोठी स्वप्ने दाखविण्यापेक्षा संकटांचे स्वरूप स्पष्टपणे सांगणे आणि त्यावर ठोस उपाययोजना मांडणे अधिक आवश्यक असते. नागरिकांना धीर देणारे नेतृत्व आणि दूरदृष्टी असलेली धोरणे ही कोणत्याही देशाच्या प्रगतीची गुरुकिल्ली असते. संकट कितीही मोठे असले तरी योग्य नियोजन, पारदर्शकता आणि जनतेचा विश्वास यांच्या बळावर त्यावर मात करता येते.भारत महासत्ता होण्याच्या दिशेने निश्चितच वाटचाल करीत आहे; परंतु त्या प्रवासात वास्तवापासून दूर जाऊन चालणार नाही. महासत्तेची स्वप्ने पाहणे चुकीचे नाही, परंतु त्या स्वप्नांना सक्षम अर्थकारण, लोकाभिमुख धोरणे आणि संकटांचा धैर्याने सामना करणारे नेतृत्व यांची जोड मिळाली तरच ती स्वप्ने खऱ्या अर्थाने साकार होतील. अन्यथा स्वप्नांचा उंच डोंगर आणि वास्तवातील संकटांचा डोंगर यांच्यातील दरी अधिक वाढत जाईल.**

# शिक्षण व्यवस्थेतील वाढता बाजारवाद, कोचिंग क्लासेसचे जाळे आणि मूल्याधारित शिक्षणाची गरज

देशातील शिक्षणव्यवस्था आज एका अत्यंत गंभीर वळणावर उभी आहे. अलीकडेच समोर आलेल्या नीट परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणाने संपूर्ण देश हादरून गेला. लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित असलेल्या या परीक्षेत गैरप्रकार झाल्याची माहिती समोर आल्यानंतर सामान्य पालक, विद्यार्थी आणि समाजमनात मोठा संताप निर्माण झाला आहे. या घटनेमुळे अनेक वर्षांपासून लोकांच्या मनात दडून राहिलेला एक प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.विद्यार्थी शाळांपेक्षा कोचिंग क्लासेसना अधिक महत्त्व का देतात?

आज परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की, अनेक विद्यार्थी केवळ शाळेत नाव ठेवतात; परंतु त्यांचे खरे शिक्षण कोचिंग क्लासेसमध्येच चालते. शाळा केवळ परीक्षा केंद्र किंवा प्रमाणपत्र मिळवण्याचे साधन राहिल्या आहेत, तर कोचिंग क्लासेस हे ''यशाची हमी'' देणारे उद्योग झाले आहेत. गेल्या वीस-पंचवीस वर्षांत हा प्रकार अत्यंत वेगाने वाढला. एकेकाळी शिक्षक हे समाजाचे मार्गदर्शक मानले जात होते; परंतु आता शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात व्यावसायिकता आली आहे. ''फी भरा आणि मार्क मिळवा'' अशी मानसिकता तयार होत चालली आहे. ही स्थिती अत्यंत धोकादायक आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी शहरात येऊन हजारो, लाखो रुपये खर्च करून कोचिंग क्लासेसमध्ये प्रवेश घेतात. गरीब शेतकरी कर्ज काढून मुलांना शिक्षण देतात. काही पालक स्वतःच्या गरजा कमी करून मुलांच्या फी भरतात. प्रश्न असा आहे की, एवढा पैसा खर्च करण्याची वेळ का येते? आपल्या शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यात अपयशी ठरत आहेत का? जर शाळांमध्ये उत्तम शिक्षण मिळत असेल, तर विद्यार्थ्यांना वेगळ्या कोचिंग क्लासची गरजच काय? आज अनेक ठिकाणी शाळा ओस पडलेल्या दिसतात, तर कोचिंग क्लासेसमध्ये गर्दी उसळलेली असते. सकाळपासून रात्रीपर्यंत विद्यार्थी वेगवेगळ्या बॅचमध्ये बसून अभ्यास करताना दिसतात. विशेष म्हणजे, अनेक विद्यार्थी सहजपणे ६० ते ८० टक्के गुण मिळवत आहेत. पूर्वी ३५ टक्के गुण मिळाले तरी विद्यार्थी आनंद साजरा करत असत. अनेक विद्यार्थी प्रचंड कष्ट करून कसाबसा पास होत असत. त्या काळात आजच्यासारखे मोठमोठे कोचिंग उद्योग नव्हते. तरीही विद्यार्थी प्रामाणिकपणे अभ्यास करत होते. आज मात्र गुणांची स्पर्धा इतकी वाढली आहे की, गुणांच्या मागे धावताना शिक्षणाचे मूल्यच हरवले आहे.

सध्याच्या परिस्थितीत ''मार्क्स'' हेच यशाचे मापदंड बनले आहेत. विद्यार्थ्यांच्या ज्ञानापेक्षा त्यांचे टक्केवारी अधिक महत्त्वाची मानली जाते. परिणामी, शिक्षण हा ज्ञानप्राप्तीचा मार्ग न राहता स्पर्धेचा आणि पैशाचा बाजार बनत चालला आहे. काही ठिकाणी तर प्रश्नपत्रिका फुटणे, पैसे घेऊन प्रवेश मिळवणे, कॉपी प्रकरणे, व्यवस्थापन कोटा, बनावट प्रमाणपत्रे अशा प्रकारांचे जाळे निर्माण झाले आहे. ''मॅनेजमेंट'' हा शब्द आज शिक्षण व्यवस्थेत फार सहजपणे वापरला जातो. अनेक कामे मॅनेज होतात, असे खुलेआम बोलले जाते. ही मानसिकता शिक्षणासाठी अत्यंत घातक आहे. नीटसारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये जर गैरप्रकार होत असतील, तर सामान्य दहावी-बारावीच्या परीक्षांची स्थिती काय असेल, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. लाखो विद्यार्थी प्रामाणिकपणे मेहनत घेतात; पण काही लोक पैशाच्या बळावर यश मिळवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास ढासळतो. मेहनत, शिस्त आणि प्रामाणिकपणा



या मूल्यांवर आघात होतो. पूर्वी महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी उत्तर प्रदेश किंवा इतर राज्यांमध्ये जात असत. त्यामागे प्रवेश प्रक्रियेमधील गैरप्रकार, कमी निकष किंवा व्यवस्थापन यंत्रणा यांची चर्चा नेहमी होत असे. आता महाराष्ट्रातील मोठ्या शहरांमध्येही अशाच प्रकारचे जाळे निर्माण होत असल्याची भीती वाटू लागली आहे. शिक्षण हा समाज घडवण्याचा पाया आहे; पण त्याच शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचार वाढू लागला, तर राष्ट्राच्या भविष्यासमोर मोठे संकट उभे राहील. आज अनेक कोचिंग क्लासेस विद्यार्थ्यांना ''रँक'' मिळवून देण्याचे आश्वासन देतात. मोठमोठ्या जाहिराती, टॉपर विद्यार्थ्यांचे फोटो, आकर्षक बॅनर, एअर कँडिशन्ड वर्ग, डिजिटल बोर्ड, लाखोंची फी या सगळ्यामुळे शिक्षण क्षेत्रात एक वेगळीच स्पर्धा सुरू झाली आहे. परंतु प्रश्न असा आहे की, हे सर्व खऱ्या अर्थाने शिक्षण आहे का? की हा केवळ गुणांचा व्यापार आहे? शिक्षणाचे खरे उद्दिष्ट केवळ नोकरी मिळवणे नसते. शिक्षणाने माणसामध्ये विचारशक्ती, नैतिकता, संवेदनशीलता, सामाजिक बांधिलकी आणि स्वाभिमान निर्माण व्हायला हवा. पण आजची शिक्षण व्यवस्था अनेकदा विद्यार्थ्यांना केवळ ''डिग्री होल्डर'' बनवत आहे. मोठमोठ्या पदव्या मिळत आहेत; पण मूल्याधारित व्यक्तिमत्त्व तयार होत नाही. ''हाफ नॉलेज इज डेंजरस'' ही म्हण आजच्या परिस्थितीत अत्यंत योग्य वाटते. अर्धवट ज्ञान घेऊन बाहेर पडणारी पिढी समाजासाठी धोकादायक ठरू शकते.



**दत्तोपंत डहाळे**
नांदेड.

शिक्षण क्षेत्रातील या बिघडलेल्या परिस्थितीसाठी केवळ विद्यार्थी किंवा पालक जबाबदार नाहीत. शासन, शिक्षण विभाग, शाळा व्यवस्थापन, शिक्षक, परीक्षा मंडळे आणि समाज यांनाही आत्मपरीक्षण करावे लागेल. अनेक ठिकाणी शाळांना मान्यता दिली जाते; पण प्रत्यक्षात तिथे गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते का, याची तपासणी होत नाही. काही ठिकाणी शाळा या केवळ राजकीय नेत्यांचे कुरण बनल्या आहेत. शिक्षण संस्था चालवणे म्हणजे समाजसेवा न राहता व्यवसाय बनला आहे. लाखो रुपयांच्या पगारावर शिक्षक नेमले जातात; पण विद्यार्थी मात्र कोचिंग क्लासेसमध्ये शिकून यश मिळवत आहेत. मग प्रश्न उभा राहतो की, शाळांची खरी भूमिका काय उरली आहे? ग्रामीण भागातील शाळांची अवस्था तर अधिक चिंताजनक आहे. अनेक ठिकाणी शिक्षकांची कमतरता, अपुरी साधनसामग्री, प्रयोगशाळांचा अभाव, दर्जाहीन अध्यापन आणि विद्यार्थ्यांमध्ये वाढती उदासीनता दिसून येते. परिणामी, ग्रामीण विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांमध्ये मागे पडावे लागते. शहरांतील कोचिंग क्लासेसचा खर्च सर्वसामान्य कुटुंबांना झेपत नाही; पण तरीही पालक मुलांच्या भविष्यासाठी तो भार उचलतात. ही सामाजिक विषमता देखील गंभीर आहे.


आज शिक्षणात ''गुण'' मिळवणे सोपे झाले आहे; पण ''ज्ञान'' मिळवणे कठीण झाले आहे. इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल साधने आणि ऑनलाइन शिक्षणामुळे माहिती सहज उपलब्ध झाली आहे; परंतु विचार करण्याची क्षमता कमी होत चालली आहे. विद्यार्थी पाठांतरावर अधिक भर देत आहेत. परीक्षेत गुण मिळवण्यासाठी तयार उत्तरे शिकवली जातात. त्यामुळे सर्जनशीलता, संशोधन वृत्ती आणि स्वतंत्र विचार करण्याची क्षमता कमी होत आहे. देशाला खरोखर सबळ बनवायचे असेल, तर केवळ पदवीधर नव्हे तर चारित्र्यसंपन्न, अभ्यासू आणि राष्ट्रनिष्ठ युवक तयार करावे लागतील. आज देशात काही अत्यंत अभ्यासू आणि प्रामाणिक व्यक्तींना थेट राज्यसभेत संधी दिली जाते किंवा मोठी मंत्रीपदे दिली जातात. कारण त्यांच्या जीवनात पारदर्शकता, अभ्यास, निष्ठा आणि देशासाठी काम करण्याची भावना असते. उदाहरणार्थ, देशातील काही परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री किंवा तज्ज्ञ अधिकारी हे निवडणूक राजकारणातून आलेले नसून त्यांच्या ज्ञानामुळे आणि कार्यक्षमतेमुळे त्यांना जबाबदारी देण्यात आली आहे. समाजाला अशाच गुणवत्तापूर्ण नेतृत्वाची गरज आहे.

खरे शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकातील माहिती नव्हे. शिक्षणाने माणूस घडला पाहिजे. त्याच्यामध्ये नैतिक मूल्ये, कर्तव्यभावना, सामाजिक जाणीव आणि देशप्रेम निर्माण झाले पाहिजे. परंतु आज अनेक विद्यार्थी केवळ नोकरी, पैसा आणि परदेशातील करिअर या गोष्टींनाच यश मानत आहेत. समाजासाठी काम करणारी, देशासाठी त्याग करणारी आणि प्रामाणिकपणे जबाबदारी पार पाडणारी पिढी तयार होणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील गैरप्रकार थांबवण्यासाठी कठोर कायदे आणि पारदर्शक यंत्रणा आवश्यक आहेत. परीक्षा प्रक्रियेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पेपरफुटी रोखली पाहिजे. कोचिंग क्लासेसवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार झाले पाहिजे. शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण अध्यापन, प्रयोगशील शिक्षण आणि नैतिक मूल्यांचे शिक्षण अनिवार्य केले पाहिजे. शिक्षकांना केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी नव्हे तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी प्रेरित केले पाहिजे. विद्यार्थ्यांनीही केवळ गुणांच्या मागे धावण्याऐवजी ज्ञान, कौशल्य आणि मूल्य यांना महत्त्व दिले पाहिजे. पालकांनी मुलांवर अवास्तव अपेक्षांचे ओझे टाकू नये. समाजानेही ''जास्त मार्क म्हणजेच हुशारी'' ही चुकीची मानसिकता बदलली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता वेगळी असते. कोणीतरी डॉक्टर होईल, कोणीतरी शास्त्रज्ञ, कोणीतरी शेतकरी, कोणीतरी कलाकार पण प्रत्येक क्षेत्रात प्रामाणिक आणि जबाबदार माणूस घडणे अधिक महत्त्वाचे आहे. आज शिक्षण क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवण्याची गरज आहे. मूल्याधारित शिक्षण, पारदर्शक परीक्षा पद्धती, गुणवत्तापूर्ण शाळा, जबाबदार शिक्षक आणि जागरूक समाज यांच्या माध्यमातूनच देशाचे भविष्य सुरक्षित राहू शकते. अन्यथा, कोचिंग क्लासेसचा वाढता बाजार, पैशासाठी होणारे गैरप्रकार आणि शिक्षणातील भ्रष्टाचार यामुळे देशाची बौद्धिक आणि नैतिक शक्ती कमजोर होईल.

शेवटी, शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून राष्ट्रनिर्मितीचे सर्वात प्रभावी माध्यम आहे, हे आपण विसरता कामा नये. देशाला फक्त डिग्रीधारक नव्हे, तर विचारवंत, संशोधक, प्रामाणिक अधिकारी, संवेदनशील नागरिक आणि मूल्यनिष्ठ नेतृत्व हवे आहे. शिक्षणामध्ये प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि गुणवत्ता टिकवली, तरच भारत खऱ्या अर्थाने ज्ञानसंपन्न आणि सबळ राष्ट्र बनेल.

# संवर्धनाला धक्का न लावता माहूरगडाचा विकास-जिल्हाधिकारी

## माहूरगड विकासात साधेपणा आणि व्यवहार्यतेवर भर



माहूर/प्रतिनिधी-श्रीक्षेत्र श्री रेणुकामाता मंदिर परिसराचा विकास करताना धार्मिक महत्त्व, पुरातत्वीय वारसा आणि भाविकांच्या सुविधांचा समतोल राखूनच अंतिम विकास आराखडा तयार करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.दि.७ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे आयोजित आढावा बैठकीत माहूरगड विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी रेणुकामाता मंदिर परिसर, दत्तात्रय मंदिर परिसर, मातृतीर्थ, पर्यटक सुविधा केंद्र तसेच प्रस्तावित पायाभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला.

बैठकीत रेणुकामाता मंदिर परिसर, दत्तात्रय मंदिर परिसर, अनुसयामाता मंदिर परिसर, पर्यटक सुविधा केंद्र तसेच मातृतीर्थ परिसरातील विकासकामांवर चर्चा करण्यात आली. वाढत्या भाविकसंख्येमुळे निर्माण होणारी गर्दी, वाहनतळाची कमतरता आणि भविष्यातील सुविधा यावर विशेष भर देण्यात आला. पर्यटक सुविधा केंद्राजवळ स्वतंत्र वाहनतळ उभारण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. मंदिर परिसरात दर्शन मंडप, संरक्षक भिंती, पादचारी मार्ग, सार्वजनिक सुविधा, सौर ऊर्जा व्यवस्था, आच्छादित पायऱ्या, प्रसादालय, प्रशासनिक इमारती व परिसर सुशोभीकरण यांसारख्या विकास घटकांवर सविस्तर चर्चा झाली. उपलब्ध जागेचा योग्य वापर आणि संरचनात्मक सुरक्षितता लक्षात घेऊन आवश्यक त्या ठिकाणी संरक्षण भिंती उभारण्याबाबतही सूचना देण्यात आल्या.सदर बैठकीत राज्य पुरातत्व विभागाने मंदिर परिसराचे संवर्धनाभिमुख सादरीकरण केले. मूळ मंदिराचे स्वरूप अबाधित ठेवून मर्यादित आणि साध्या स्वरूपातील विकासकामे करण्यावर विभागाने भर दिला. विशेषतः माथा भागावरील जागा विस्तारीकरण, मोठ्या शिखररचना आणि अत्याधिक बांधकामांमुळे नैसर्गिक व पुरातत्वीय वैशिष्ट्यांना धोका निर्माण होऊ शकतो, असा आक्षेप पुरातत्व विभागाने नोंदविला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी विकास आराखडा तयार करताना उपयुक्तता, साधेपणा आणि व्यवहार्यता या तीन तत्त्वांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले. दर्शन मंडप साधा, व्यवहार्य आणि कमी देखभाल खर्चाचा असावा, तसेच प्रस्तावित नऊ शिखरांची संख्या कमी करण्याबाबतही सूचना करण्यात आल्या.

वन विभागाशीही बैठक घेऊन मंदिर परिसरासाठी सुमारे २ हेक्टर आणि संपूर्ण विकास आराखड्यासाठी अंदाजे ११ हेक्टर वनजमिनीच्या नियोजना बाबत चर्चा करण्यात आली. बैठकीत शक्तीपीठ महामार्ग, वर्धा-नांदेड रेल्वेमार्ग, प्रस्तावित लिफ्ट व स्कायवॉक प्रकल्पामुळे भविष्यात भाविकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. त्या पार्श्वभूमीवर आवश्यक त्या प्रमाणात जागा विस्तार गरजेचा असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले.सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पुरातत्व विभाग यांच्या आराखड्यांमध्ये तफावत असल्याने मुख्य रेणुकामाता मंदिर संवर्धनाचे काम पुरातत्व विभागाकडे, तर बाह्य पायाभूत सुविधा व विस्तारीकरणाची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्याबाबत चर्चा झाली. यासाठी पुरातत्व नियमांच्या अधीन राहून सुधारित आराखडा तीन ते चार दिवसांत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी मंत्रालयातील पुरातत्व विभागाच्या संचालकांशी दूरध्वनीद्वारे चर्चा करून संवर्धन आणि विकास यामध्ये संतुलन साधणारा सकारात्मक व व्यवहार्य तोडगा काढण्याची आवश्यकता व्यक्त केली. अखेरीस, माहूर विकास आराखडा हा धार्मिक, सांस्कृतिक, पर्यटन आणि भाविक सुविधा यांचा समन्वय साधणारा एकात्मिक विकास प्रकल्प म्हणून विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले. सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करून सुरक्षित, व्यवहार्य, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि भविष्योन्मुख आराखडा तातडीने अंतिम करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. या वेळी विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर, भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# एसटीची प्रवास दरवाढ अपरिहार्य- परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई/प्रतिनिधी- डिझेलच्या वाढत्या किमतीमुळे एसटी महामंडळावर कोट्यवधी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याने आगामी काळात एसटीच्या तिकीटदरात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याबाबत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महत्त्वाचे संकेत दिले आहेत.

जागतिक स्तरावर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थिती आणि भू-राजकीय तणावाचा परिणाम आता इंधन दरांवर स्पष्टपणे दिसू लागला असून, त्याचा थेट फटका राज्य परिवहन महामंडळाला बसत आहे. माध्यमांशी संवाद साधताना सरनाईक म्हणाले की, राज्य परिवहन महामंडळाला दररोज सुमारे १० लाख ८७ हजार लिटर डिझेलची आवश्यकता असते. इंडियन ऑईल कंपनीकडून डिझेलचा पुरवठा केला जात असून, मागील आठवड्यात प्रतिलिटर तीन रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या वाढीमुळे एसटी महामंडळाला दररोज तब्बल ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. त्यामुळे वर्षाकाठी सुमारे १२४ कोटी रुपयांचा तोटा होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जागतिक स्तरावर युद्धाचा भडका अधिक वाढल्यास परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते.पंतप्रधानांनीही इंधन बचतीबाबत आवाहन केले आहे. त्यामुळे भविष्यात काय परिस्थिती निर्माण होईल, हे सध्या सांगता येत नाही, असेही सरनाईक म्हणाले. सरकारकडून विशेष सवलत किंवा अनुदान मिळाल्यास तिकीटदर वाढविणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उद्या होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्री यांना यासंदर्भात पत्र देण्यात येणार आहे. मे अखेरपर्यंत आम्ही प्रतीक्षा करणार आहोत. पुढील १० ते १२ दिवसांत केंद्र आणि राज्य सरकारने आर्थिक मदत केली तर दरवाढ टाळता येईल असेही त्यांनी स्पष्ट केले.

# हदगाव शहरात शासनमान्य देशी दारु दुकाने व बिअर बारमुळे नागरिक त्रस्त

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरात शासनमान्य देशी दारू दुकाने आणि बिअर बारमुळे सर्वसामान्य नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. मोक्याच्या व रहदारीच्या ठिकाणी सुरू असलेल्या या दुकानां मुळे परिसरात अस्वच्छता, गोंधळ आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.जिल्ह्याच्या राज्य उत्पादन शुल्क विभाग, नांदेड यांचे या प्रकरणाकडे कमालीचे दुर्लक्ष असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. विभागाचे अस्तित्व केवळ कागदोपत्री असल्या सारखे वाटत असून प्रत्यक्षात नियंत्रण व तपासणी होताना दिसत नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.

या प्रकाराविरोधात स्थानिक महिलांनी या पूर्वी पोलिसांकडे निवेदन दिले असले तरी अद्याप ठोस कारवाई झाल्याचे दिसत नाही. आमच्या मुली शाळा-कोचिंगला जाताना भीती वाटते, अशी वेदना काही महिलांनी व्यक्त केली. मात्र, तक्रारी नंतरही परिस्थितीत बदल न झाल्याने महिला वर्ग हतबल झाल्याचे चित्र आहे प्रशासन जागे होणार कधी ?नागरिकांनी वारंवार निवेदने देऊनही कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. शासनमान्य परवाना असला तरी कायदा व सुव्यवस्थेचे नियम, स्वच्छतेचे निकष आणि सामाजिक जबाबदारी पाळली जात नसल्यास संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे.हदगाव शहरातील नागरिकांचा सवाल स्पष्ट आहे. राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि स्थानिक पोलीस यांनी सयुक्त कार्यवाही करने आवश्य अरालयाच मत अनेक नागरिकांनी व्यक्त केले. शहरातील शांतता, सुरक्षितता आणि स्वच्छता अबाधित राखण्यासाठी तात्काळ संयुक्त तपासणी मोहीम राबवून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होतांना दिसून येत आहे.

### अस्वच्छतेचा कळस;आरोग्य धोक्यात...

शहरातील काही शासनमान्य देशी दारू दुकानांमध्ये अस्वच्छतेचा कळस गाठला आहे. दूषित पाण्याच्या झाऱ्या, एकाच स्टीलच्या ग्लासचा वापर, शेजारीच असलेली उघडी मुतारी, तसेच दारुड्यांनी केलेली घाण, हे चित्र सर्वसामान्य नागरिकांच्या डोळ्यात अंजन घालणारे आहे. परिसरात दुर्गंधी पसरलेली असून स्वच्छतेचे कोणतेही निकष पाळले जात नसल्याचे दिसून येते.मोक्याच्या ठिकाणी बिनधास्त विक्री शासकीय गोडाऊन परिसर, आठवडी बाजार, राठी चौक आणि नवीन बसस्थानका समोरील भागात सुरू असलेल्या या दारू विक्री केंद्रांवर संबंधित विभागाचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे चित्र आहे. मुख्य रस्त्यावर दारू पिऊन गोंधळ घालणे, शिवीगाळ करणे, महिलांकडे अयोग्य कटाक्ष टाकणे अशा प्रकारांमुळे महिला व मुलींना रोज भीतीच्या छायेतून जावे लागत आहे.

# राहेर येथील गोदावरीच्या पात्रात अनोळखी महिलेचा मृतदेह आढळला

नांदेड/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील कुंटूर पोलीस स्टेशन अंतर्गत राहेर येथील गोदावरी नदीपात्रात १७ मे रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास एका अनोळखी महिलेचा मृतदेह तरंगताना आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दत्त मंदिराच्या शेजारी पुलाजवळ ही घटना उघडकीस आली. स्थानिक भोई समाजातील मासेमारी करणाऱ्या नागरिकांना नदीत मृतदेह तरंगताना दिसताच त्यांनी तातडीने कुंटूर पोलीस स्टेशन येथे माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून पोउपनि मल्लिकार्जुन कारामुंगे यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलीस अंमलदार गजानन चापलकर व निळकंठ निमलवाड यांच्या मदतीने तसेच स्थानिक मच्छीमारांच्या सहकार्याने महिलेचा मृतदेह तसेच सायंकाळी नदीपात्रातून बाहेर काढण्यात आला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी मृतदेह नायगाव शासकीय रुग्णालय येथे पाठविण्यात आला.मृत महिलेचे अंदाजे वय ३० वर्षाच्या आसपास असून ती चॉकलेटी व पांढऱ्या रंगाची सहावारी साडी परिधान केलेली असून चॉकलेटी रंगाचा ब्लाऊज घातलेली आहे.

# जनआंदोलनानंतर प्रशासनाला जाग;गोकुंदा-किनवट मार्गावरील एक कि.मी.रस्त्याच्या कामाला सुरुवात

किनवट/प्रतिनिधी-लोह मार्गाच्या गोकुंदा येथील उड्डाणपूलाच्या उभारणीचा प्रलंबित प्रश्न पुन्हा रेंगाळत ठेवल्याने सलग्न असलेल्या एक कि.मि. रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाला अगदी जलदगतीने सुरुवात झाली असून, तमाम नागरिकांनी या डांबरीकरणाच्या कामाकडे लक्ष देऊन दर्जेदार काम करुन घेतल्यास सोयीचे होईल असे मारोती सुंकलवाडांचे म्हणने आहे. मार्चमध्ये सुंकलवाडांनी छेडलेल्या जनानदोलनाला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रशासनाने प्रतिसाद दिल्याने प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली हे विशेष.

भोकर ते किनवट दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्गावरील गोकुंदा येथील सेंट मेरी इंग्लिश स्कूल पासून ते किनवटच्या सरहद्दीपर्यंतच्या जवळपास एक कि.मि. लांबीच्या कामाला सुरुवात झाली आहे. पुर्वीच्या रस्त्यावर प्लेट मारण्यात आली आहे. गिट्टी वाहतूक चालू आहे. सात मिटर रुंदीचा रस्ता असणार आहे. जीसीबीचा पहिला स्तर १५ सेंटीमीटरचा आहे. दुसरा स्तर डब्ल्यूबीएमचा १५ सेंटीमीटरचा असेल. डीबीएमचा ६० सेंटीमीटरचा तिसरा स्तर असून ४० सेंटीमीटरचा बीसीचा चौथा स्तर असणार असे सुंकलवाडांनी एका व्हॉयरल मॅसेजद्वारा कळविल्याने जेणे करून निर्माणाधीन डांबरीकरणाचे काम दर्जेदार व्हावे हाच एकमेव उद्देश असावा असे बोलल्या जात आहे. सुंकलवाडांच्या जनांदोलनाकडे ज्यांनी पाठ फिरवली आज कामाला गतीमान सुरुवात झाल्यानंतर पाठ फिरवणाऱ्यांनी श्रेयासाठी आता तोंड फिरवून आंदोलनाची भाषा



करतांना दिसतात. अशा श्रेयधाऱ्यांमुळेच अशी कामे धूळखात पाडलीत. पावसाळ्यापूर्वी डांबरीकरण व्हायला पाहिजेत. सरपंचांपासून ते अशा अनेक श्रेयधाऱ्यांनी प्रसिद्धीझोतापुरती आंदोलनाची कृतीशुन्य डरकाळी फोडण्यापेक्षा वेगळे काही केलेले नाही. आंदोलन करुन श्रेय मिळवायचे असेल तर उड्डाण पुलासाठी खुशाल आंदोलन करा. पण सुरुवात झालेल्या कामांची खीळ काढू नये. चालू असलेल्या कामात कोणी जाणीवपूर्वक खोडा घालीत असेल तर सर्व संबंधित यंत्रणांनी गंभीर दखल घ्यावी असे अनेकांनी बोलून दाखवले.

# पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नालेसफाई मोहिमेला सुरुवात

मुखेड/प्रतिनिधी-आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुखेड नगर परिषदेच्या वतीने शहरात व्यापक नालेसफाई मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. शहरातील विविध भागांमध्ये गटारी व नाल्यांमध्ये साचलेला गाळ, कचरा आणि झाडाझुडपांची साफसफाई सुरू असून जेथे शक्य आहे त्या ठिकाणी जेसीबी मशिनच्या साहाय्याने नालेसफाई करण्यात येत आहे. साफसफाईतून बाहेर काढण्यात आलेला कचरा ट्रॅक्टरद्वारे शहराबाहेर टाकण्यात येत आहे.

नगराध्यक्ष सौ. विजया देबडवार तसेच मुख्याधिकारी विकास बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली हे स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. पावसाळ्यापूर्वी शहरातील नाले स्वच्छ करून पावसाचे पाणी सुरळीत वाहून जावे, नागरिकांना पाणी साचण्याचा त्रास होऊ नये तसेच रोगराई पसरण्यापासून प्रतिबंध व्हावा, या उद्देशाने ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. नगरपालिकेत भारतीय जनता पक्षाचे १४ तर शिवसेनेचे ६ नगरसेवक असून शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी दोन्ही पक्षांचे पदाधिकारी व नगरसेवक सक्रियपणे प्रयत्न करत आहेत. शिवसेना गटनेते प्रा. विनोद आडेपवार तसेच भाजप गटनेते नागनाथ लोखंडे यांच्यासह सर्व नगरसेवकांनी वेळोवेळी स्वच्छतेच्या कामांकडे लक्ष देत प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या आहेत. नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे आणि पावसाळ्यात साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी ही साफसफाई मोहीम चालू करण्यात आली आहे.

# उन्हाच्या झळा सोसेनात; शितपेयांची मागणी वाढली

नांदेड/प्रतिनिधी-शहरात वाढत्या उष्णतेमुळे थंड पाणी, शितपेये आणि ज्यूसच्या विक्रीत मोठी वाढ झाली आहे. तापमानाचा पारा दिवसेंदिवस चढत असल्याने नागरिक उकाड्यापासून दिलासा मिळवण्यासाठी थंड पेयांकडे वळताना दिसत आहेत.

शहरातील चौक, बाजारपेठा, बसस्थानक, रेल्वे स्थानक परिसरात थंड पाण्याच्या बाटल्या, लिंबूपाणी, उसाचा रस आणि विविध शीतपेयांच्या स्टॉल्सवर नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. विशेषतः दुपारच्या वेळेत विक्रीत मोठी वाढ होत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. यंदा उष्णता जास्त जानवत असल्याने थंड पाण्याची मागणी वाढली आहे. रोजच्या तुलनेत विक्री दुपटीने वाढली, असल्याचे ही काही दुकानदारांनी सांगितले.

# गोवंश वाहतूक प्रकरणी सहा जणांवर गुन्हा दाखल;सात लाखाचा मुद्देमाल जप्त

देगलूर/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत देगलूर पोलिसांनी अवैध गोवंश वाहतुकीवर मोठी कारवाई करत सहा आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पाच गोवांश जनावरे व बोलेरो पिकप वाहन असा तब्बल सात लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई दि.१६ मे रोजी नरंगल रोड टी पॉईंट परिसरात करण्यात आली. याप्रकरणी पोलीस स्टेशन देगलूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची फिर्याद पोलीस कर्मचारी श्रीनिवास चिंदमवार यांनी दिली असून पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव तथा उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सूर्य मोहन बोलमवाड यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी सापळा रचून नरंगल रोड टी पॉईंट येथे बोलेरो पिकप क्रमांक एम एच-१२ एस. एक्स १५८९ अडवून तपासणी केली. तपासणी दरम्यान वाहनांमध्ये दोन गोरे व तीन बैल अशा पाच गोवंश जनावरांचे अवैधरीत्या वाहतूक सुरू असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी तात्काळ जनावरे ताब्यात घेत वाहनासह एकूण सात लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.याप्रकरणी ज्ञानेश्वर गेटेवार, (रा. होनवडज), इस्माईल इमामसाय आता, (रा.पाळा) अबन्न पि. पुरमवार(रा.मदनुर, तेलंगणा),शेख अजीम शेख अली (रा.रफाई कॉलनी देगलूर),मोहसीन रफिक कुरेशी देगलूर व आसिफ सलीम कुरेशी(रा.अंबुलगा झाडी) यांच्याविरुद्ध देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अधिक मासास प्रारंभ;मंदिरांमध्ये धार्मिक कार्यक्रमांची लगबग

मुखेड/प्रतिनिधी-हिंदू पंचांगानुसार अधिक मासास प्रारंभ झाला असून, संपूर्ण महिनाभर धार्मिक वातावरण राहणार आहे. सुमारे ३२ महिने १६ दिवसांनी येणारा हा अधिक मास पुरुषोत्तम मास म्हणूनही ओळखला जातो. हिंदू धर्मात या महिन्याला अत्यंत पवित्र मानले जाते. त्यामुळे मंदिरांमध्ये पूजा-अर्चा, भजन, कीर्तन, हरिपाठ, भागवत पारायण, सत्संग आणि विविध धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात झाली आहे. या निमित्ताने शहरातील गणाचार्य मठ संस्थान व बालाजी मंदिर मुखेड येथे अधिक मासानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

धार्मिक मान्यतेनुसार चांद्र वर्ष आणि सौर वर्ष यामधील फरक भरून काढण्यासाठी अधिक मासाची रचना करण्यात आली आहे. या महिन्यात भगवान विष्णूंची विशेष पूजा केली जाते. अनेक भाविक उपवास, जप, दानधर्म, अन्नदान आणि तीर्थयात्रा करण्यास प्राधान्य देतात. तसेच गोरगरीबांना धान्य, वस्त्र आणि अन्नदान केल्यास विशेष पुण्य प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे. अधिक मासात विवाह, गृहप्रवेश, वास्तुशांती, मुंज यांसारखी मंगलकार्ये पारंपरिक पद्धतीनुसार टाळली जातात. मात्र धार्मिक साधना, वाचन, नामस्मरण आणि भक्तीकार्यांसाठी हा काळ अत्यंत शुभ मानला जातो. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातील मंदिरांमध्ये सकाळपासूनच भाविकांची गर्दी पाहायला मिळत आहे. विविध धार्मिक मंडळे आणि मंदिर समित्यांकडून प्रवचनमाला, हरिनाम सप्ताह, भजन स्पर्धा व सामूहिक पूजा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, अधिक मासामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.दरम्यान या अधिक मासाच्या निमित्ताने गणचार्य मठ संस्थान मुखेड येथे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे तसेच बालाजी मंदिर मुखेड येथे अधिकमास महोत्सवानिमित्य दि.१५ मे पासून दररोज सायंकाळी ६ वा. प्राचार्य प. पू. अनंतराव आठवले विरचित श्रीकृष्ण कथामृत व अधिकमास महात्म्य सांगीतले जाणार आहे, तरी भाविकांनी या कथा श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक हभप यज्ञेश्वर हरिहर महाराज दिक्षित यांनी केले आहे.

# खडकी येथे तरुणावर हल्ला

नांदेड/प्रतिनिधी- शेतातील पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी चारी (नाली) काढण्याच्या किरकोळ कारणावरुन दोन सख्ख्या भावांनी संगनमत करुन एका तरुणावर कुऱ्हाडीने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना खडकी (ता.नांदेड) येथे घडली. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला आहे. गणेश मारोतराव कदम (वय २६, रा.खडकी) हे शेतात चारीचे काम करत असताना, गावातीलच आरोपी प्रभाकर ग्यानोजी कल्याणकर व सोनाजी प्रभाकर कल्याणकर यांनी तू इथे काम का करतोस? म्हणून वाद उकरुन काढला. वाद वाढल्याने आरोपींनी जीवे मारण्याच्या उद्देशाने गणेश यांच्या डोक्यात आणि मानेवर जबर मारहाण करुन गंभीर दुखापत केली. या प्रकरणी लिंबगाव पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोउपनि सय्यद करत आहेत.


## जाहीर प्रगटन

मा.श्रीमती आर.बी.सोरेकर दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अर्धापूर, यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.८४/२०२६
वर्षा वाघोळे व इतर विरुद्ध निरंक

अर्जदार : १. वर्षा बालाजी वाघोळे, वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी रा.मु.पोस्ट नाळेश्वर,नांदेड, २. ज्योती संतोष बगाटे, वय : ३४ वर्षे, धंदा : गृहिणी रा.देवगिरी कॉलोनी,रांजणगाव, औरंगाबाद

विरुद्ध

गैरअर्जदार : निल

दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मयत अक्षय पि.शिवाजी सूर्यवंशी व कमलाकर पि.शिवाजी सूर्यवंशी यांचे अर्जदार क्र.१ व २ हे मयताचे सख्या बहिणी आहेत. अक्षय पि. शिवाजी सूर्यवंशी यांचा मृत्यू दिनांक ०१/०६/२०२४ रोजी झाला आहे व कमलाकर पि.शिवाजी सूर्यवंशी यांचा मृत्यू दिनांक ०८/०९/२०२५ रोजी झाला आहे. अर्जदारांशिवाय मयतांचे कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदार यांनी मयत अक्षय पि.शिवाजी सूर्यवंशी व कमलाकर पि.शिवाजी सूर्यवंशी यांचा वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील संबधिताना मयतांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसांच्या आत किंवा दिनांक १९/०६/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी. अर्ज दिनांक ११/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| **क.लिपिक** | **स.अधिक्षक** |
| दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,अर्धापूर | दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,अर्धापूर |



# जनगणनेसाठी आता घरोघरी प्रगणक येणार!

## १६ मे ते १४ जून दरम्यान घर भेटीद्वारे माहिती संकलन

माहूर/प्रतिनिधी-भारताच्या १६ व्या राष्ट्रीय जनगणना २०२७ अंतर्गत स्व-गणना टप्प्यानंतर आता प्रत्यक्ष घरोघरी जाऊन जनगणनेचे काम सुरू होणार आहे. १६ मेपासून तालुक्यात प्रगणक नागरिकांच्या घरी भेट देणार असून नागरिकांनी अचूक माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार अभिजित जागताप यांनी केले आहे.

भारत सरकार व राज्य शासनाच्या निर्देशानुसार यंदाची जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने राबविण्यात येत आहे. स्व-गणना सुविधा १ मे ते १५ मे या कालावधीत उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यानंतर आता १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणक घरभेटीद्वारे माहिती पडताळणी व नोंदणी करणार आहेत.जनगणना ही देशाच्या भविष्यातील विकास आराखड्याचा पाया मानली जाते. शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते, घरकुल, रोजगार, शेती, अन्नसुरक्षा आणि विविध शासकीय योजनांचे नियोजन जनगणनेतील आकडेवारीच्या आधारे केले जाते. तहसीलदार अभिजित जागताप यांनी सांगितले की, जनगणना ही केवळ लोकसंख्या मोजणी नसून प्रशासनासाठी महत्त्वाचा डेटा संकलन उपक्रम आहे. नागरिकांनी कोणतीही माहिती लपवू नये किंवा चुकीची देऊ नये. अचूक माहितीमुळे शासनाला विकास योजनांचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येते. जनगणनेदरम्यान येणाऱ्या अधिकृत प्रगणकांना सहकार्य करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. तालुक्यातील ग्रामीण भागातील जनगणनेची तयारी पूर्ण झाली असून सर्व प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षणही पूर्ण करण्यात आले आहे. जनगणना प्रक्रियेमध्ये गोपनीयतेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार असून नागरिकांनी कोणतीही भीती बाळगू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांना प्रगणकांना योग्य माहिती देताना आवश्यक कागदपत्रे जवळ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. घरातील सदस्यांची संख्या, शिक्षण, व्यवसाय, स्थलांतर, पाणीपुरवठा, स्वच्छता सुविधा, इंटरनेट वापर, वाहनांची संख्या, घराची स्थिती, इंधन वापर आणि इतर मूलभूत माहिती विचारली जाणार आहे. नागरिकांनी शांतपणे आणि संयमाने सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. स्व-गणना केलेल्या नागरिकांनी आपला SE ID क्रमांक उपलब्ध करून द्यावा. त्यामुळे पडताळणी प्रक्रिया अधिक वेगवान होईल, असे आवाहन तहसीलदार अभिजित जागताप यांनी केले आहे.

# अवैध धंद्यांविरोधात किनवट पोलिसांची मोठी कारवाई





## पत्रकारासह नऊ जुगारी जेरबंद,लाखोंचा मुद्देमाल जप्त,गावठी दारु अड्डाही उद्ध्वस्त

किनवट/प्रतिनिधी-गोकुंदा येथील दत्तनगरात १६ मे च्या रात्री किनवट पोलीसांनी नियोजनबद्ध सापळा रचून जुगार अड्ड्यावर धाड घातली. दरम्यान कँन्ट्राटदारं, पत्रकार अशा काही धनदांडग्या नऊ जुगार मल्लांना मुद्देमालासह रंगेहाथ पकडून किनवट पोलीसात गुन्ह्याची नोंद करून कारवाईचे सोपस्कार पूर्ण केले. पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी ऑपरेशन क्रॅक डाऊनचे सातत्य लागल्यामुळे अवैध धंद्यांना बऱ्यापैकी चाप बसतांना दिसतोय.

१६ मेच्या रात्री किनवट पोलीस ठाण्याच्या पथकाने गोकुंदा शहरातील दत्तनगर भागातील टीनशेडमध्ये चालू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून नागोराव गंगाराम रापनवार (वय ५५ वर्ष) व्यवसाय शेती रा. राजगडतांडा, यांचा मोबाईलसह रोकड १२ हजार आणि ४० हजाराची दुचाकी. आनंदराव सखाराम वाढे (वय ७५ वर्ष) रा.घोटी, यांच्याही मोबाईलसह रोकड १३,७०० रुपये. असद खान मेहबूब खान (वय ५८ वर्षे) व्यवसाय व्यापार रा. शिवाजीनगर किनवट, मोबाईलसह १३,८०० रुपये आणि ४० हजाराची स्कुटी. राम जयराम राठोड (वय ६० वर्ष) व्यवसाय शेती रा.मलकापूर, मोबाईलसह १४,५०० रुपये आणि ३५ हजाराची दुचाकी. सुरेश पांडुरंग माने (वय ६० वर्ष) व्यवसाय शेती रा.रामनगर किनवट, मोबाईलसह १४, ९०० रुपये रोकड आणि ४० हजाराची दुचाकी. अनिल कराळे (वय ४० वर्ष) व्यवसाय शेती रा. कमठाला, मोबाईलसह १६,५०० रुपये आणि ५० हजाराची दुचाकी. दत्ता उद्धव कसबे (वय ४८ वर्षे) रा.घोटी, मोबाईलसह २२,७०० रुपय. आणि रॉयल एनफिल्ड कम्पनीची ८० हजार रुपयांची बुलेटगाडी. दाऊद सुलेमान चव्हाण (वय ५८ वर्ष) व्यवसाय मजुरी रा.समतानगर किनवट, मोबाईलसह १७,६०० रुपये. गौतम बेलाजी येरेकर (वय ७० वर्षे) रा.दत्तनगर, मोबाईलसह १५,५०० रुपये हस्तगत केले आहेत. दरम्यान जुगारमल्लांना रंगेहाथ पकडून रोकड ६४,९०० रुपये, ७४ हजार रुपयांचे नऊ मोबाईल तसेच २ लाख ८५ हजार रुपयांचे सहा मोटार सायकली असा ४,२३,९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केलाय. फिर्याद वरून गुन्हा दाखल करून पो.नि.कराडांच्या आदेशावरून बीट हे.कॉ.मेंडके यांच्याकडे पुढील तपास सोपवल्याचे समजते. अवैध रेती गौण खनिज व्यवसाय, जुगार-दारु-मटका या अवैध व्यवसायाविरुद्ध सामाजिक बांधिलकी जोपासत पत्रकारांनी आवाज बुलंद करून प्रशासनाला जाब विचारायला हवा. परंतु प्राप्त माहितीनुसार काही पत्रकारंच अवैध व्यवसायात गुंतल्याचे पोलीस प्रशासनाने केलेल्या कारवाईनंतर धक्कादायक माहिती समोर आलीय. त्यामुळे पत्रकारीता क्षेत्रात कुतूहल निर्माण होणे स्वाभाविक आहे. भुलजा गावाजवळील मारोती तोटरे यांच्या वीटभट्टी लगतच्या प्रांगणात बोधडी खुर्द येथील नानंग गोबरा ढमाळ यांच्या गावठी हातभट्टी दारु उत्पादक अड्ड्यावर किनवट पोलीसांनी धाड घालून जवळपास ३६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केलाय. किनवट पोलीसात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पुढील तपास चालू असल्याचे सांगितले. मोहफूलाचे फसफसचे रसायनयुक्त २०० लिटर क्षमतेच्या तीन प्लास्टिकच्या टाक्या म्हणजे सहाशे लिटर रसायन पोलीस पथकाने उध्वस्त केले. पोहेकाँ.प्रदीप आत्राम यांच्या फिर्यादीवरून सदरचा गुन्हा दाखल झालाय. पुढील तपास पोहेकाँ. वाघमारे करीत असल्याचे सांगितले.

## छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त २० रोजी भव्य जन्मोत्सव सोहळा

कुंडलवाडी/प्रतिनिधी-येथील छावा मराठा संघटनेच्या वतीने स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त भव्य जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दि.२० मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता शहरातील के. रामलू मंगल कार्यालय येथे संपन्न होणार असल्याची माहिती छावा संघटनेचे शहराध्यक्ष प्रा. डॉ. माधव हळदेकर यांनी दिली.

या कार्यक्रमात स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज:काल, आज आणि उद्या या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दहावी बोर्ड परीक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांचा आणि पत्रकारांचा गौरव करून त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलावार या राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध व्याख्याते तथा जिजाऊ ब्रिगेडच्या प्रवक्त्या डॉ. भारती मढवई, छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष किशोरभाऊ चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्ष इंजि. तानाजी हुसेकर, संघटक प्राचार्य डॉ. कमलाकर कणसे, प्रवक्ते डॉ. प्रभाकर जाधव तसेच जिल्हाध्यक्ष इंजि. प्रवीण जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.याशिवाय उपनगराध्यक्षा सौ.नेहा याकावार, सोसायटीचे चेअरमन सुनील बेजगमवार, माजी चेअरमन साईनाथ उत्तरवार, माजी उपनगराध्यक्ष डॉ. विठ्ठलराव कुद्रुमुलवार, माजी उपाध्यक्ष राजेश्वरराव उत्तरवार, दक्षिण भाजपा व्यापारी आघाडी नांदेडचे उपाध्यक्ष दिनेश दाचावार, धर्माबादचे उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील, सहा.पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे तसेच शहरातील सर्व नगरसेवक व नगरसेविका उपस्थित राहणार आहेत.या जन्मोत्सव सोहळ्यास कुंडलवाडी शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन छावा संघटनेचे अध्यक्ष प्रा. डॉ. माधव हळदेकर यांनी केले आहे.




अखिल भारतीय छावा विद्यार्थी आघाडीच्यावतीने शिक्षणाचे बाजारीकरण करणाऱ्या व नीट पेपरफुटी प्रकरणातील आरसीसीचे मोटेगावकर यांच्या प्रतिकात्मक प्रतिमेला काळे फासून जोडे मारो आंदोलन करण्यात आले. या संदर्भात विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या संबंधीतांवर कठोर कार्यवाही करावी या मागणीसाठी एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

## सीमावर्ती भागासाठी दिलासादायक निर्णय;आता दर्जेदार रस्त्याचीच अपेक्षा

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर -करडखेड-मरखेल-हणेगाव मार्गाच्या सर्वेक्षण व डीपीआर प्रक्रियेला अखेर हिरवा कंदील मिळाल्यानंतर काही जण या कामाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करत असले तरी प्रत्यक्षात या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे आ.जितेश अंतापूरकर यांचे प्रयत्न निर्णायक ठरल्याची भावना सीमावर्ती भागातून व्यक्त होत आहे. अनेक वर्षांपासून रखडलेल्या या प्रश्नाला शासन दरबारी पाठपुराव्याच्या जोरावर गती मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. खड्डेमय आणि धोकादायक बनलेल्या या मार्गामुळे शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी व रुग्णांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत होता. आता एडीबी सहाय्यित योजनेतून या रस्त्याच्या विकासाची प्रक्रिया सुरू होत असल्याने सीमाभागात आशेचा किरण निर्माण झाला आहे.

हा मार्ग केवळ एका तालुक्यापुरता मर्यादित नसून महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणा या तीन राज्यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे या रस्त्याचे आर्थिक, सामाजिक आणि व्यापारी महत्त्व प्रचंड आहे. सीमाभागातील शेतमाल वाहतूक, शिक्षण, आरोग्य सेवा आणि धार्मिक पर्यटनासाठी हा मार्ग जीवनवाहिनी मानला जातो. मात्र, वर्षानुवर्षे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या रस्त्याची दुरवस्था झाली होती. पावसाळ्यात खड्ड्यांनी रस्ता अक्षरशः गायब होत होता. अपघात, वाहनांचे नुकसान आणि प्रवाशांची गैरसोय हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनला होता.शेतकऱ्यांना बाजारपेठेत पोहोचण्यासाठी तासन्तास संघर्ष करावा लागत होता, तर रुग्णवाहिका सेवेलाही मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या. विद्यार्थी आणि नोकरदार वर्गालाही खराब रस्त्यांमुळे त्रास सहन करावा लागत होता. सीमाभागातील नागरिकांनी सातत्याने आवाज उठवूनही प्रशासनाने दीर्घकाळ दुर्लक्ष केले; तेव्हा कुठे आता शासनाने या प्रश्नाची गंभीर दखल घेतली आहे. आता मंजुरी मिळाल्याने नागरिकांच्या अपेक्षा उंचावल्या असल्या तरी केवळ घोषणा करून चालणार नाही. राज्यातील अनेक रस्ते प्रकल्प मंजुरीनंतर कागदावरच अडकून पडल्याची उदाहरणे ताजी आहेत. त्यामुळे सर्वेक्षण, डीपीआर आणि प्रत्यक्ष काम यामध्ये अनावश्यक विलंब होऊ नये, याची जबाबदारी प्रशासनावर आहे. निधी मंजूर होऊनही कामे रखडणे, निकृष्ट दर्जाचे बांधकाम आणि कँन्ट्राटदारांची मनमानी हे प्रकार थांबले तरच या निर्णयाचा खरा फायदा नागरिकांना मिळेल. लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केला, ही निश्चितच सकारात्मक बाब आहे; मात्र आता त्याच जोमाने कामाच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवणेही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. सीमावर्ती भागाच्या विकासासाठी हा रस्ता महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. दळणवळण, व्यापार, शिक्षण, आरोग्य सेवा आणि धार्मिक पर्यटनाला या मार्गामुळे मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. मात्र त्यासाठी प्रशासनाची कार्यक्षमता, पारदर्शकता आणि वेळेत काम पूर्ण करण्याची इच्छाशक्ती आवश्यक आहे. सीमाभागातील नागरिकांना आता आश्वासनांची नव्हे, तर दर्जेदार, सुरक्षित आणि टिकाऊ रस्त्याची अपेक्षा आहे.

## अधिक मासानिमित्त कंधार आगारातून विशेष बससेवेची सुविधा

कंधार/प्रतिनिधी-अधिक मासाच्या पार्श्वभूमीवर देवदर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता कंधार आगारामार्फत आक्कलकोट, पंढरपूर व शेगाव या प्रमुख तीर्थक्षेत्रांसाठी विशेष बससेवेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आजपासून सुरू होत असलेल्या अधिकमासात भाविकांना सुरक्षित, सुलभ व सोयीस्कर तीर्थयात्रा करता यावी यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नांदेड विभागाने पुढाकार घेतला आहे.

रा.प.नांदेड विभागाचे विभाग नियंत्रक डॉ. चंद्रकांत वडस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष सुविधा सुरू करण्यात येत आहे. कंधार आगारातून आक्कलकोट, पंढरपूर, तसेच शेगाव येथे जाण्या येण्यासाठी प्रवाशांचा समूह तयार झाल्यास विशेष बसची व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती प्रभारी आगार व्यवस्थापक अनिल पळनाटे यांनी दिली. त्यामुळे भाविकांना समूहाने थेट देवदर्शनासाठी प्रवास करण्याची मोठी सोय उपलब्ध झाली आहे. या विशेष बससेवेतून प्रवास करणाऱ्या भाविकांना महाराष्ट्र शासनाच्या विविध प्रवासी सवलतींचा लाभमिळणार आहे. महिलांसाठी लागू असलेली महिला सन्मान योजना, अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, वर्षांवरील नागरिकांना देण्यात येणारी प्रवास सवलत, अंध व अपंग प्रवाशांसाठी विशेष सवलत, तसेच विद्यार्थ्यांसाठीच्या विविध सवलती लागू राहणार आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना कमी खर्चात तीर्थाटनाची संधी मिळणार आहे. अधिकमासाच्या काळात भाविकांनी समूह तयार करून या विशेष बससेवेचा लाभ घ्यावा व सुरक्षित प्रवासासह देवदर्शनाचा आनंद घ्यावा, असे आवाहन कंधार आगाराचे प्रभारी आगार व्यवस्थापक अनिल पळनाटे यांनी केले आहे.

## २ हजार ५६० शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अनुदान जमा

मुखेड/प्रतिनिधी-तालुक्यातील २ हजार ५६० शेतकरी शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांच्या बँक खात्यात ४० लाख ३५ हजार अनुदान जमा झाले असल्याची माहिती पुरवठा निरीक्षक एन. जी. रोहणकर यांनी दिली.

शेतकऱ्यांना स्वस्त धान्य दुकानामार्फत धान्य मिळावे, म्हणून पावळ्या रंगाची शिधापत्रिका उपलब्ध करून दिली. काही कालावधीनंतर त्यांना धान्याऐवजी ठराविक रक्कम देण्याचे जाहीर करून धान्य पुरवठा बंद केला. परंतु, सदरील लाभार्थ्यांचे अनुदान निधीअभावी रखडले होते. वर्ष २०२५-२६ मध्ये अनुदान प्राप्त झाल्यानंतर फेब्रुवारी २०२६ पर्यंतचे ४० लाख ३५ हजार रुपये अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आले आहे.दरम्यान, सार्वजनिक जीवनात शिधापत्रिका ही नागरिकांसाठी शासकीय कामासाठी, रहिवासी असल्याचा पुरावा म्हणून आवश्यक असल्याने शिधापत्रिका काढण्यासाठी शेतकऱ्यांनी तहसीलकडे अर्जही केले.परंतु, शिधापत्रिका मिळण्यास विलंब होत होता. दरम्यान पुरवठा निरीक्षकपदी प्रथमच रोहणकर यांनी पदभार स्वीकारला. दरम्यान, शिधापत्रिकेसाठी अर्जाची नोंदणी करून शेतकऱ्यांना क्रमांक देण्याची व निर्धारित वेळेत त्यांची कामे पूर्ण करण्याचे धोरणाचा पुरवठा निरीक्षक एन. जी. रोहणकर यांनी अवलंब सुरू केला.

पान १ वरुन

### पत्रकारांना डावलून खरीप...

अपेक्षित होती. मात्र अशा कोणत्याही मुद्द्यांवर चर्चा झाल्याचे समोर आले नसल्याने ही बैठक घाईघाईत उरकून घेतल्याची चर्चा सुरू आहे.दरम्यान, आ.बाबुराव कदम कोहळीकर यांनीही पत्रकारांना माहिती न दिल्या बाबत नाराजी व्यक्त केली. प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना त्यांनी सांगितले की, खरीप हंगाम नियोजन आढावा बैठकीची माहिती तालुक्यातील पत्रकारांना कृषी विभागाने देणे आवश्यक होते. ही बाब मी मान्य करतो. यापुढे संबंधित अधिकाऱ्यांकडून अशी चूक होणार नाही, याबाबत संबधीत अधिका-याला सूचना देण्यात येतील .एकँदर शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या खरीप पूर्व नियोजन बैठकीत पारदर्शकतेचा अभाव दिसून आल्याने कृषी विभागाबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पान १ वरुन

### नीट पेपरफुटी प्रकरणः...

परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सीबीआयच्या पथकाने काल दुपारपासून शहरातील विविध ठिकाणी छापेमारी करत महत्त्वाचे दस्तऐवज आणि डिजिटल पुरावे ताब्यात घेतले. यापूर्वी सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांनाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले होते. त्यामुळे या प्रकरणातील तपासाची व्याप्ती वाढल्याचे मानले जात आहे. शुक्रवारी पहाटेपासून सीबीआयचे अधिकारी मोटेगावकर यांच्या सुतमील परिसरातील निवासस्थानी दाखल झाले होते. विद्यार्थ्यांच्या नोंदी, आर्थिक व्यवहार, परीक्षा संदर्भातील माहिती तसेच इलेक्ट्रॉनिक उपकरणांची कसून तपासणी करण्यात आली. त्यानंतर उद्योग भवन परिसरातील आरसीसी कार्यालयात जाऊनही विविध माहिती आणि नोंदी संकलित करण्यात आल्या.आजही सीबीआयचे पथक आरसीसीच्या कार्यालयात तपास करत असून, संपूर्ण कारवाईबाबत मोठ्या प्रमाणात गोपनीयता पाळण्यात येत आहे. देशभरात नावाजलेल्या या कोचिंग संस्थेचा वार्षिक महसूल शंभर कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याची माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

### नीट परीक्षा घोटाळ्याविरोधात...

आहे. स्थानिक प्रशासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन आमच्या मागण्या तात्काळ केंद्र सरकारकडे पोहोचवाव्यात, अशी विनंती एसएफआयने केली आहे. या आंदोलनात कॉ.उज्वला पडलवार, कॉ.गंगाधर गायकवाड, कॉ.पवन जगडमवार यांच्यासह जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थी आणि एसएफआयचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### व्ही.डी.सतीशन यांनी...

सरकार कोसळले होते. राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्या व्यतिरिक्त, माजी मुख्यमंत्री पी. विजयन, भाजप नेते राजीव चंद्रशेखर आणि काँग्रेसशासित सर्व राज्यांचे मुख्यमंत्रीही या सोहळ्याला उपस्थित होते.१९६२ मध्ये संपूर्ण मंत्रिमंडळाने शपथ घेतली होती. यापूर्वी, १९६२ मध्ये मुख्यमंत्री आर. शंकर यांनी त्यांच्या संपूर्ण मंत्रिमंडळासह शपथ घेतली होती. आज, ६४ वर्षांनंतर, केरळमधील सरकारमधील सर्व मंत्र्यांनी एकत्र शपथ घेण्याची ही दुसरी वेळ आहे. दरम्यान, शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री सतीशन यांनी आपली पहिली मंत्रिमंडळ बैठक घेतली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.केरळ मंत्रिमंडळात पहिल्यांदाच १४ आमदारांनी मंत्री म्हणून शपथ घेतली. यामध्ये सी. पी. जॉन आणि एन. शमसुद्दीन, के. एम. शाजी, पी. के. बशीर आणि व्ही. ई. अब्दुल गफूर, पी. सी. विष्णूनाथ, रोझी एम. जॉन, बिंदू कृष्णा, टी. सिद्दिकी, के. ए. तुळसी आणि ओ. जे. जनिश यांचा समावेश आहे. काँग्रेसने सभापती आणि उपाध्यक्ष ही पदे आपल्याकडे ठेवली आहेत. थिरुवनचूर राधाकृष्णन यांची सभापती आणि शनिमोल उस्मान यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

## कोर्टाच्या फटकारणीनंतर शिवसेनेकडून माजी सरन्यायाधीशांवरही जहरी टीका

मुंबई/प्रतिनिधी-शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाबाबत सुरू असलेल्या न्यायालयीन लढाईवरून ठाकरे गटाचे खा.संजय राऊत यांनी पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयावर तीव्र शब्दांत निशाणा साधला आहे. माजी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्यावरही कठोर टीका केली आहे.

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादावर गेल्या साडेतीन ते चार वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. मात्र अद्याप अंतिम निर्णय न झाल्याने ठाकरे गटाकडून सातत्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर १६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने ठाकरे गटाच्या नेत्यांच्या न्यायव्यवस्थेविरोधातील वक्तव्यांवर तीव्र नाराजी व्यक्त करत, अशा प्रकारची विधाने सहन केली जाणार नाहीत, अशा शब्दांत कानउघडणी केली होती.यानंतर मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना संजय राऊत यांनी पुन्हा न्यायालयीन प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत आम्ही टीका करत राहू. आम्हाला फक्त तारखांवर तारखा दिल्या जात आहेत. निवडणूक आयोग हा सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली काम करत आहे. लोकशाही धोक्यात आली असून आम्ही त्याविरोधात आवाज उठवत राहणार, असे राऊत म्हणाले.तसेच, सर्वोच्च न्यायालयाने संविधानातील दहाव्या अनुसूचीनुसार निर्णय द्यावा. आम्ही बाहेर काय बोलतो, यावर निकाल लागू नये. आम्ही चुकीचे बोललो तर शिक्षा द्या, पण न्याय मात्र द्या, असेही त्यांनी स्पष्ट केले.यावेळी राऊतांनी माजी सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्यावरही निशाणा साधत, सर्व काही चुकीच्या दिशेने चालले आहे, हे त्यांनाही माहिती होते. पण न्यायदान करताना ते ठाम भूमिका घेऊ शकले नाहीत, असा आरोप केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा राजकीय आणि न्यायालयीन वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४